CMYK

जिल्ह्यात आजपासून महसूल सप्ताहाला सुरुवात; नागरिकांनी सहभागी व्हावे - जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील >>पान 2

हत्ती गुजरातला हलवला पाहिजे, तेथून शंकेला सुरुवात, काँग्रेस आ. सतेज पाटील यांची प्रतिक्रिया : नांदणी येथील मठाला दिली भेट >>पान 3

नागरे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग राबविते गेल्या दहा वर्षापासून स्वच्छतेचा अनोखा उपक्रम >>पान 4

**सुविचार**

यशासाठी प्रामाणिकपणा आणि परिश्रम आवश्यक


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 13 ■ शुक्रवार, दि. 01 ऑगस्ट 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




प्राजक्ता माळीसोबत सेल्फी काढण्यासाठी चाहत्याने जीव घातला धोक्यात

आतील पान

# मालेगाव स्फोट प्रकरणातील सर्व आरोपींची निर्दोष सुटका; १७ वर्षानंतर निकाल जाहीर

दैनिक आपला विदर्भ

**मालेगाव/प्रतिनिधी :** मालेगाव स्फोट प्रकरणातील सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. केवळ संशयाच्या आधारावर आरोपीना दोषी ठरवू शकत नाही. त्यामुळे सगळ्या आरोपींची निर्दोष सुटका करण्यात येत आहे, असं एनआयएच्या विशेष न्यायालयाकडून सांगण्यात आले. १००० पानांहून अधिक पानांचा निकाल असल्याचं न्यायालयाकडून स्पष्ट करण्यात आले. मालेगावमध्ये २९ सप्टेंबर २००८ साली झालेल्या भीषण बॉम्बस्फोट प्रकरणी न्यायालयाने (३१ जुलै) निकाल सुनावण्यात आला.

भिक्खू चौकात झालेल्या या स्फोटात ६ निरपराध नागरिकांचे प्राण गेले. तर १०० हून अधिक जण गंभीर जखमी झाले होते. बॉम्बस्फोटाच्या या घटनेनंतर अनेक कुटुंबं उध्वस्त झाली होती. आता, तब्बल १७ वर्षानंतर या प्रकरणाचा निकाल मुंबईच्या एनआयए या विशेष न्यायालयात आज निकाल सुनावण्यात आला. निर्दोष सुटका होताच आरोपींनी न्यायालयाचे आभार



मानले. आज आम्हाला खऱ्या अर्थाने न्याय मिळाला, असं म्हणत आरोपी भावूक झाल्याचेही पाहायला मिळाले.

बॉम्ब ब्लास्ट झाल्याचं सरकारी पक्षानं सिद्ध केलं. पण ब्लास्ट स्कूटरमध्ये झाला हे सिद्ध करण्यात सरकारी पक्ष अपयशी ठरल्याचं न्यायालयाने सांगितलं. तपासात अनेक त्रुटी होत्या. या सगळ्या त्रुटीचं वाचन देखील न्यायालयात करण्यात आले. पंचनामा योग्य नव्हता. जागेवरून हातांचे ठसे जप्त करण्यात आले नाही, असं निरिक्षणही न्यायालयाने नोंदवलं. चेसीस नंबर दुचाकीचा देखील कधी रिकव्हर करण्यात आला नाही. साध्वी प्रज्ञा सिंह ठाकूर दुचाकीची मालक होती हे देखील स्पष्ट नाही, असं न्यायालयाकडून स्पष्ट करण्यात आले. बैठकांसंदर्भातही तपास यंत्रणेचे दाव्यांवर न्यायालयाचं समाधान झालं नाही. आधी लावलेला मोक्कानंतर मगे घेतल्याने याअंतर्गत सगळे जबाब निरर्थक असल्याचं न्यायालयाने सांगितलं. ळअइअ साठी घेण्यात आलेली मान्यता चुकीची आहे. त्यामुळे ळअइअ लागू होत नाही. लष्करी



### १७ वर्षांनी निर्दोष सुटका; प्रज्ञा सिंह ठाकूरांची पहिली प्रतिक्रिया-

मला जेव्हा पहिल्यांदा चौकशीला बोलावलं होतं तेव्हा मी माणुसकीच्या नात्याने न्यायचा सन्मान करून मी आले होते. १३ दिवस मला टॉर्चर करण्यात आलं. माझं आयुष उध्वस्त केलं. मी १७ वर्ष अपमानित झाले. मला स्वत:च्याच देशात आतंकवादी बनवलं. ज्यांनी मला हे दिवस आणले त्याबद्दल मी काही बोलू शकत नाही. संन्यासी आहे म्हणून मी जिवंत आहे. मला ऐकल्याबद्दल मला समजून घेतल्या बद्दल आभार...भगव्याला आंतकवादी म्हटलं. भगव्याचा विजय झाला हिंदुत्वाचा विजय झाला. ज्यांनी हिंदुत्वाला आतंकवादाच नाव दिलं त्यांना कधी माफ केलं जाणार नाही, असं निकालानंतर प्रज्ञा सिंह ठाकूर म्हणाल्या.

अधिकारी असलेल्या कर्नल प्रसाद पुरोहित यांच्या विरोधात आरोपपत्र दाखल करण्यापूर्वी घेण्यात आलेल्या मान्यतेवरदेखील न्यायालयाकडून सवाल उपस्थित करण्यात आले. आरडीएक्स कर्नल प्रसाद पुरोहितांनी आणलं याचा पुरावा नाही, असंही न्यायालयाकडून स्पष्ट करण्यात आले. सगळ्या आरोपींना संशयाचा फायदा बेनिफिट ऑफ डाऊट आहे. केवळ संशयाच्या आधारावर आरोपीना दोषी ठरवू शकत नाही. त्यामुळे सगळ्या आरोपींची निर्दोष सुटका करण्यात येत आहे, असं न्यायालयाकडून सांगण्यात आले.

### कोणा कोणाला आरोपी ठरवले होते

१. प्रसाद पुरोहित
२. साध्वी प्रज्ञासिंह
३. समीर कुलकर्णी
४. रमेश उपाध्याय
५. अजय राहिरकर
६. सुधाकर द्विवेदी
७. सुधाकर चतुर्वेदी
८. रामजी कालसंग्रा - फरार
९. शामजी साहू - फरार
१०. संदीप डांगे - फरार
११. प्रविण तकलकी - फरार
१२. राकेश धावडे - फरार

# आरडीएक्स आलं कुठून हा प्रश्न अजुनही अनुत्तरीतच

## आमदार जितेंद्र आव्हाड यांचा पत्रकार परिषदेत आरोप

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** मालेगाव प्रकरणात जो काही न्याय दिला असेल त्याच्याविरोधात किंवा बाजुने बोलण्याचा मला अधिकार नाही. ज्या दिवशी बॉम्बब्लास्ट मध्ये सर्व आरोपींना शोधलं, आरडीएक्स कोणाच्या घरी होतं शोधून काढलं. आरडीएक्स आलं कुठून? हा प्रश्न अजूनही अनुत्तरीतचं राहिलाय. ६५ किलो आरडीएक्स आलं कुठून? हा प्रश्न आहे. असे मत आमदार जितेंद्र आव्हाड यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त करीत मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणावर आपली प्रतिक्रिया दिली.

पत्रकार परिषदेत ते म्हणाले की, ज्या दिवशी हेमंत करकरे यांची हत्या झाली. त्याचं दिवशी या खटल्याचा निकाल लागलेला होता. आतंकवादाला जात, धर्म, रंग, पंथ नसतो, आतंकवादी आतंकवादी



असतो. कोणत्याही धर्माशी त्याचा संबंध जोडू नये. हे उशिरा सुचलेले शहाणपण त्यांना आज सुचत असेल तर ठीक आहे.आतंकवादाला धर्माचं नाव देणं योग्य नाही, हे आधीपासून आम्ही सांगत आहोत. बानो प्रकरणात आरोपींना जेलमधून बाहेर काढण्यात आले, त्यांचा सत्कार करण्यात आला. पेढे वाटण्यात आले ही कायद्याचे उल्लंघन आहे. कोर्टाने निकाल दिलेला आहे. यावर अधिक काही बोलणं योग्य राहणार नाही. काँग्रेसचा यात काही संबंध नाही. बांद्राच्या बॉम्बब्लास्ट मधले देखील आरोपी निर्दोष सुटले, मग हे काय कुठल्या राजकीय पक्षांनी केलं? हा प्रश्न निर्माण होत आहे. त्या दिवशी हेमंत करकरे यांची हत्या झाली त्याचं दिवशी या खटल्याचा निकाल लागला होता. महादेव मुंडे प्रकरणाचा तपास व्यवस्थित झालेला नाही हे पूर्ण पुराव्यानिशी सिद्ध होत आहे. या खुना मागचा आका कोण होता आणि कुठल्या आकाने खून केला हे बीडकरांपासून काही लपून राहिलेले नाही. मला जी माहिती बीड मधून मिळते आहे की, एक महिला तयार होईल आणि ती सांगेल की, महादेव मुंडेंला मी मारलं याची संपूर्ण तयारी झालेली आहे.बघू आता ती महिला किती हिंमत दाखवते.त्या महिलेला पुढे केलं जाईल आणि अकाला वाचवण्यासाठी हे केलं जाईल. असे मत यावेळी आमदार जितेंद्र आव्हाड यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

### धर्माचा आणि दहशतवादाचा संबंध नाहीष्ठ मालेगाव निकालावर माजी गृहमंत्री अनिल देशमुख स्पष्टच बोलले

**मुंबई /प्रतिनिधी :** मालेगाव बॉम्बस्फोटाशी संबंधित खटल्याचा निकाल राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) कायद्याअंतर्गत स्थापन विशेष न्यायालयाने दिला असून साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर, ले. कर्नल प्रसाद पुरोहित यांच्यासह सात आरोपींची पुराव्याअभावी सुटका करण्यात आली आहे. या निकालावर राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मुंबई सत्र न्यायालयात एका कामासाठी आले असताना माध्यम प्रतिनिधींनी अनिल देशमुख यांच्याशी संवाद साधला. तेव्हा 'धर्माचा आणि दहशतवादाचा संबंध नाही', असे अनिल देशमुख यांनी स्पष्टपणे सांगितले.

मालेगाव बॉम्बस्फोटानंतर देशात 'भगवा दहशतवाद' या शब्दाची चर्चा झाली. याप्रकरणी सत्ताधारी व विरोधकांमध्ये खडाजंगी झाली होती. मात्र भगवा आणि दहशतवादाचा काहीही संबंध नाही. धर्माचा आणि दहशतवादाचा एकमेकांशी संबंध नाही. दहशतवाद हा दहशतवाद असतो, असे स्पष्ट मत अनिल देशमुख यांनी व्यक्त केले.

# न्यायालयाच्या माध्यमातून काँग्रेसला चपराक

## मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाच्या निकालावर मंत्री दादा भुसे यांची प्रतिक्रिया

**नाशिक/प्रतिनिधी :** मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाच्या निकालाने न्यायालयाच्या माध्यमातून काँग्रेसला चपराक बसली आहे. अशी प्रतिक्रिया मंत्री दादा भुसे यांनी माध्यमांशी बोलताना दिली. माध्यमांशी बोलताना मंत्री दादा भुसे म्हणाले की, ज्यांनी कुणी दुष्कर्म केलं त्यांना शोधून शिक्षा करणं अपेक्षीत आहे.

त्याकाळच्या राजकर्त्यांनी राजकारण केलं. निरपराध लोकांना जेलमध्ये राहावे लागले.न्यायालयाने न्यायनिवाडा केला. दुष्ट लोकांना चपराक मिळाली. ज्यांनी कृत्य केलं त्यांना शासन झालं पाहिजे.भगव्याला बदनाम करण्याचे षड्यंत्र केलं गेलं. केविलवाणा प्रयत्न झाला. पेशंट लोकं ऍडमिट केली जात होती. हिन्दू संघटनांनी रक्तदान केलं. त्यावेळी राजकारण केलं, साधू संतांनी सेवा केली त्यांना जेलमध्ये टाकलं गेलं. वरिष्ठ न्यायालयात सुद्धा हाच निर्णय कायम राहील. निरपराध लोकांना गंभीर कलम लावले, मूळ गुन्हेगारांपर्यंत गेले असते तर शासन झालं असत.



काँग्रेसच्या काळात भगवा दहशतवाद हा विषय आणला. काँग्रेस वाल्यांनी देशाची मागितली पाहिजे.निरपराध साधू संतांना जेलमध्ये टाकलं, न्यायालयाने सिद्ध केलं. बाळासाहेब ठाकरेंना आज आनंद झाला असेल. काँग्रेसने जी अंमलबजावणी केली त्याचे दुःख होतं. पोलीस विभागाची जबाबदारी कायदा सुव्यवस्था राखणे आहे. हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांना बदनाम केलं, भगवा दहशतवाद हिंदू आतंकवाद सजबद वापरले.मालेगावला न्याय मिळाला पाहिजे, मुंबई स्फोटात जे गेले त्यांनाही न्याय मिळाला पाहिजे, असे मत मंत्री दादा भुसे यांनी यावेळी व्यक्त केले.

### चौघांच्या सामूहिक आत्महत्येला जबाबदार पोलीस पाटलासह तिघांना १० वर्षांची शिक्षा

**धुळे/प्रतिनिधी :** एकाच कुटुंबातील चौघांचा शारीरिक आणि मानसिक छळ करून त्यांना आत्म हत्या करण्यास भाग पाडणाऱ्या तत्कालीन पोलीस पाटलासह तिघांना न्यायालयाने १० वर्षांची शिक्षा सुनावली आहे. जिल्हा आणि सत्र न्यायाधीश माधुरी आनंद यांनी हा निकाल दिला आहे. ११ फेब्रुवारी २०१७ रोजी नरडाणा हद्दीतील आसाराम भबुता भिल याने पत्नी आणि दोन मुले, एका मुलीसह आत्महत्या केली होती. तसेच मुलगी वैशाली ही सुदैवाने बचावली असून, तिच्या तक्रारीवरून नरडाणा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. मृत आसारामने आत्महत्येपूर्वी लिहून ठेवलेल्या चिठ्ठीत आरोपी भिला चंद्रा भिल, चंदर झिया भिल आणि गावाचे तत्कालीन पोलीस पाटील प्रवीण ओंकार पाटील हे त्यांचा आणि कुटुंबाचा सातत्याने शारीरिक आणि मानसिक छळ करीत असल्याचा आरोप केला होता. त्यामुळे त्यांना रात्रीच्या वेळी गाव सोडून जावे लागले, तसेच गाव सोड किंवा फाट्यावर जाऊन जीव दे, अशी थेट धमकी दिल्याचे असल्याचे स्पष्टपणे नमूद केले होते.

# केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या संकल्पनेतून लासुरा येथे उभारलेल्या विशेष वैद्यकीय सेवा व मदत कक्षेतुन भक्तांना दिली जातेय सेवा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** संत गजानन महाराजांच्या पालखीसोबत पायी चालणाऱ्या लाखो भक्त गणांच्या आरोग्य सुविधेसाठी लासुरा फाटा येथे वैद्यकीय सेवा आणि मदत कक्ष उभारण्यात आला होता या कक्षेला केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव हे अधिवेशनात असल्यामुळे त्यांच्या वतीने युवा सेना जिल्हा प्रमुख ऋषी जाधव यांनी आरोग्य कक्षेत उपस्थित राहून आरोग्य सेवा हीच ईश्वरसेवा श्री चरणी अर्पित करून दिला प्रत्यय ..

पंढरपूरच्या विठुरायाचे दर्शनसाठी गेलेली संत गजानन महाराजांची पालखी आषाढी एकादशीचा सोहळा आटपून पुन्हा शेगावच्या दिशेने मार्गस्थ







झाली आहे तब्बल ६१ दिवसाचा पायी प्रवास आटपून आज ३१ जुलैच्या सकाळीच ही पालखी शेगावच्या दिशेने मार्गस्थ झाली या पालखी सोबत खामगाव ते शेगाव असा पायी प्रवास बुलढाणा जिल्ह्यातील लाखो भक्त गण करत असतात भक्तांच्या सेवेसाठी केंद्रीय मंत्र्यांच्या संकल्पनेतून विशेष वैद्यकीय सेवा आणि मदत कक्ष लासुरा फाटा येथे उभारण्यात आला होता या मदत कक्षेत दोन रुग्णवाहिका डॉक्टर्स, नर्सेस यांचा पुरेसा स्टॉप आणि औषधी साठा कक्षेत ठेवण्यात होता.

या मदत कक्षेला केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव हे अधिवेशनामध्ये असल्यामुळे त्यांच्या वतीने युवा सेना जिल्हा प्रमुख ऋषी जाधव यांनी आरोग्य कक्षेत उपस्थित राहून आरोग्य सेवा हीच ईश्वरसेवा श्री चरणी अर्पित करून दिला प्रत्यय ..व वारीमध्ये सहभागी झालेल्या वारकऱ्यांचे स्वागत करत त्यांना अभिवादन केले आणि गजानन महाराजांच्या पालखीचे दर्शन घेतले आज गजानन महाराजांची पालखी संतनगरी शेगाव मध्ये दाखल झाली या पालखीसोबत लाखोभक्तगणांनी पालखीसोबत पायी चालून वारीचा आनंद घेतला वारीमध्ये सहभागी झालेल्या भक्तांना या वैद्यकीय कक्षाच्या माध्यमातून वैद्यकीय मदत करण्यात आली .

CMYK

# जिल्ह्यात आजपासून महसूल सप्ताहाला सुरुवात; नागरिकांनी सहभागी व्हावे - जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

**दैनिक आपला विदर्भ**

## विविध कार्यक्रमांचे आयोजन उत्कृष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांचा गौरव होणार लाभार्थ्यांना प्रमाणपत्र व अनुदान वाटप होणार

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या निर्देशानुसार यावर्षी दि. १ ऑगस्ट रोजी 'महसूल दिन' आणि १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत 'महसूल सप्ताह २०२५' साजरा करण्यात येणार आहे. महसूल विभागाच्या विविध कामकाजाचा आढावा घेणे, उत्कृष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांचा गौरव करणे, तसेच नागरिकांपर्यंत विभागाच्या सेवा आणि योजना पोहोचविणे, या हेतूने सप्ताहभर विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाचा लाभ अधिकाधिक नागरिकांना मिळावा यासाठी नागरिकांना सहभागी करुन घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

महसूल सप्ताहाच्या निमित्ताने महसूल विभागाकडून समाजाच्या विविध घटकांपर्यंत सेवा पोहोचवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यादरम्यान, महसूल दिनाच्या शुभारंभप्रसंगी कार्यरत आणि सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार, तसेच उत्कृष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. त्याचबरोबर लाभार्थ्यांना विविध योजनांचे प्रमाणपत्रेही वितरीत करण्यात येतील.

सप्ताहाच्या पुढील दिवसांमध्ये २०११ पूर्वीपासून शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून राहणाऱ्या पात्र कुटुंबांना पट्टे वाटप, पाणंद आणि शिवार रस्त्यांची मोजणी करून त्यांच्या दुतर्फा वृक्षलागवड, मंडळ स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाचे आयोजन, तसेच लाभार्थ्यांच्या घरी भेट देऊन डिबीटी प्रक्रिया पूर्ण करणे, हे महत्त्वाचे उपक्रम राबवले जाणार आहेत. तसेच, शासकीय जमिनीवरील अतिक्रमण हटवणे, शर्तभंग प्रकरणांबाबत निर्णय घेणे आणि शासनाच्या एम-सँड धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करून महसूल सप्ताहाची सांगता करण्यात येईल.

राज्य शासनाने महसूल प्रशासनातील पारदर्शकता वाढवून जनतेचा विश्वास संपादन करण्यासाठी अशा प्रकारच्या उपक्रमांना प्राधान्य दिले आहे. यानुसार, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक दिवशी ठराविक विषयांवर विशेष मोहिमा राबवण्यात येणार आहेत.

दि.१ ते ७ दरम्यान आयोजीत कार्यक्रम

शुक्रवार दि.१ ऑगस्ट रोजी महसूल दिन साजरा करणे व महसूल सप्ताह शुभारंभ महसूल संवर्गातील कार्यरत, सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी संवाद उत्कृष्ट अधिकारी, कर्मचारी पुरस्कार वितरण व मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्र वितरण समारंभ होणार आहे.



शनिवार दि.२ ऑगस्ट रोजी शासकीय जागेवर सन २०११ पूर्वीपासून रहिवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण असलेल्या कुटूंबापैकी अतिक्रमण नियमानुकूल करण्यास पात्र असलेल्या कुटूंबाना सदर अतिक्रमित जागांचे पट्टे वाटप करणेबाबत कार्यक्रम

रविवार दि.३ ऑगस्ट रोजी पाणंद, शिवरस्त्यांची मोजणी करुन त्यांच्या दुतर्फा झाडे लावणे.

सोमवार दि.४ ऑगस्ट रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान प्रत्येक मंडळनिहाय राबविणे.

मंगळवार दि.५ ऑगस्ट रोजी विशेष सहाय योजनेतील डीबीटी न झालेल्या लाभार्थ्यांना घरभेटी करुन डीबीटी करुन अनुदानाचे वाटप करणे.

बुधवार दि.६ ऑगस्ट रोजी शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे निष्कासित करणे व त्या अतिक्रमणमुक्त करणे तसेच शर्तभंग झालेल्या जमिनीबाबत शासन धोरणानुसार नियमानुकूल करणे, सरकारजमा करणे, निर्णय घेणे.

गुरुवार दि.७ ऑगस्ट एम सॅड धोरणाची अंमलबजावणी करणे व नवीन मानक कार्यप्रणालीप्रमाणे प्रमाणित कार्यपद्धतीनुसार धोरण पूर्णत्वास नेणे आणि महसूल सप्ताह सांगता समारंभ करण्यात येणार आहे.

नागरिकांनी महसूल विभागाच्या सेवा आणि योजनांचा लाभ घेऊन, महसूल सप्ताहामध्ये सहभागी व्हावे. तसेच, शासनाच्या कार्यपद्धतीबाबत अधिक माहिती मिळवून प्रशासनाशी सक्रिय सहभाग ठेवावा. महसूल विभाग जनतेच्या सेवेसाठी कटिबद्ध असून, महसूल सप्ताह हे त्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल आहे, असे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी सांगितले.

# अनुदानित आश्रम शाळा प्रकरणात काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर संतापल्या

**दैनिक आपला विदर्भ**

**अमरावती/प्रतिनिधी :** अमरावती जिल्ह्याच्या मेळघाट येथील नागापूर अनुदानित आदिवासी आश्रम शाळेत पाण्याची टाकी कोसळून १४ वर्षीय विद्यार्थीनीचा मृत्यू झाला होता. तर तीन विद्यार्थीनी गंभीर जखमी झाले होते. या दुर्घटना प्रकरणात काँग्रेस नेत्या व माजी मंत्री ॲड यशोमती ठाकूर यांनी थेट चिखलदरा पोलीस स्टेशनं गाठले. या प्रकरणात माजी



आमदार राजकुमार पटेल व त्यांचा मुलगा रोहित पटेल यांनी रस्त्यावर उतरून आंदोलन केल्याने रात्री पासुन पोलिसांच्या त्यांना ताब्यात घेतले होते. ही माहिती मिळताच काँग्रेस नेत्या माजी मंत्री यशोमती ठाकूर यांचा चिखलदरा पोलीस स्टेशन मध्ये गेल्या दोन तासा पासून ठिय्या आंदोलन सुरु करण्यात आलं. यावेळी पोलीस अधिकाऱ्यांना जाब विचारण्यात आला. यशोमती ठाकूर यांनी आपला संताप व्यक्त केला. शाळा भाजपा आमदाराची असल्याने पोलीस भाजप आमदारावर कारवाई करत नसल्याचा आरोप यशोमती ठाकूर यांनी केला. चिखलदरा पोलीस स्टेशनवर पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा दबाव असल्याचा यशोमती ठाकूर यांनी आरोप केला.

## प्राजक्ता माळीसोबत सेल्फी काढण्यासाठी चाहत्याने जीव घातला धोक्यात

**मुंबई/प्रतिनिधी :** अभिनेत्री प्राजक्ता माळीचा कलाक्षेत्रातील प्रवास थक्क करणारा आहे. मालिका, कार्यक्रम आणि सिनेमामध्ये वेगवेगळ्या भूमिका साकारुन तिने प्रेक्षकांच्या मनामध्ये कायमचे स्थान निर्माण केलंय. जुळून येती रेशीमगाठी या मालिकेच्या माध्यमातून प्राजक्ता घराघरात पोहोचली. यानंतर महाराष्ट्राची हास्यजत्रा या कॉमेडी शोमुळे तिचे आणि प्रेक्षकांचे मजबूत नाते निर्माण झाले. फुलवंती सिनेमाच्या माध्यमातून प्राजक्ताने सिनेनिर्मितीच्या क्षेत्रात पदार्पण केले. तिचा हा प्रवास चाहत्यांनी जवळून पाहिलाय. प्राजक्ता माळीच्या चाहत्यांची संख्याही भलीमोठी आहे. सोशल मीडियावरही प्राजक्ताचे वेगवेगळे व्हिडीओ व्हायरल होत असतात. पण नुकत्याच व्हायरल होत असलेल्या व्हिडीओने प्राजक्ताच्या चाहत्यांचे मन जिंकलंय. पण दुसरीकडे नेटकरी संताप व्यक्त करत आहेत. अमोल भास्कर नावाच्या युजरने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म इन्स्टाग्रामवर प्राजक्ता माळीचा व्हिडीओ शेअर केलाय. या व्हिडीओमध्ये त्याने प्राजक्ता माळीचा फॅन मोमेंट टिपलीय. प्राजक्ता माळीला पाहताच एक चाहता तिच्यासोबत सेल्फी काढण्यासाठी बरीच धडपड करत असल्याचे दिसतंय. चाहता सेल्फीसाठी प्रयत्न करत होता, त्यावेळेस प्राजक्ता लिफ्टच्या आतमध्ये होती. चाहत्याला इजा पोहोचू नये म्हणून लिफ्टच्या दारांमध्ये तिने पाय देखील ठेवला. शिवाय लिफ्ट बंद होऊ नये म्हणून बटणही दाबले. चाहत्याला कोणताही त्रास होऊ नये म्हणून प्राजक्ताने शक्य तितकी सर्व काळजी घेतली.

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे

आज १ ऑगस्ट, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची आज १०५ वि जयंती. मराठी मातीत जन्मलेलं एक अनमोल रत्न म्हणजे अण्णाभाऊ साठे. अण्णाभाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव शिधोजी साठे तर आईचे नाव वालुबाई. त्यांचे मूळ नाव तुकाराम असे होते. घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची व हलाखीची त्यामुळे त्यांना शिक्षण घेता आले नाही. अण्णाभाऊ केवळ दीड दिवस शाळेत गेले बाकीचे सर्व शिक्षण मुंबईच्या झोपडपट्टीत झाले. मुंबईत सुरवातीला त्यांनी मिळेल ती कामे केली नंतर त्यांना मुंबईतील गिरणीमध्ये झाडूवाल्याची नोकरी मिळाली. तिथेच त्यांना कामगारांच्या कष्टमय, दुःखमय जीवनाचे दर्शन झाले. कामगारांचे, संप, मोर्चे पाहून त्यांनी त्यांचा लढाऊपणाही अनुभवला. १९३६ साली कामगार नेते श्रीपाद अमृत डांगे यांच्या विचारांनी प्रभावित होऊन ते कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते बनले. मुंबईत त्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे ऐकली. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी ते इतके प्रभावीत झाले की त्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांना आपले गुरू मानले. वडीलांच्या निधनानंतर घरची जबाबदारी त्यांच्यावर पडल्यानंतर ते पुन्हा१ गावी आले. तिथे बापू साठे या त्यांच्या चुलतभावाच्या तमाशा फडात ते काम करू लागले. १९४२ च्या आंदोलनात सहभागी झाल्याने त्यांच्यावर पोलिसांनी पकड वारंट काढले. पोलिसांना चुकवत ते पुन्हा मुंबईला आले. मुंबईत आल्यावर लोकशाहीर म्हणून ते नावारूपास आले. १९४४ साली शाहीर अमर शेख व गव्हाणकर यांच्या मदतीने लाल बावटा या कलापथकाची त्यांनी स्थापना केली. पुढे त्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत भाग घेतला. त्यांच्या शाहिरीत लावणी, पोवाडे, लोकनाट्ये यांचा समावेश असे. महाराष्ट्राची परंपरा, मुंबई कोणाची? ही त्यांनी लिहिलेली लोकनाट्ये खूप गाजली. अकलेची गोष्ट, देशभक्त घोटाळे, बेकायदेशीर, पुढारी मिळाला यासारखी त्यांनी लिहिलेली अनेक वगनाट्य लोकप्रिय झाली. अण्णाभाऊंच्या साहित्यात कथा कादंबरीची निर्मिती ठळकपणे नजरेत भरते. जिवंत काडतुसे, आबी, खुलंवाडी, बरबाद्या कंजारी, चिरागनगरची भुते, कृष्णाकाठच्या कथा हे त्यांनी लिहिलेले कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. अण्णाभाऊंनी ३५ कादंबऱ्या लिहिल्या. चित्रा, फकिरा, वारणेचा वाघ, माकडीचा माळ, रानगंगा, चिखलातील कमळ, वैजयंता या त्यांनी लिहिलेल्या कादंबऱ्या खूप गाजल्या. फकिरा या त्यांच्या कादंबरीला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला. फकिरा ही आजही सर्वाधिक विकली जाणारी कादंबरी आहे. अनेक विद्यापीठात या कादंबरीचा अभ्यासक्रमात समावेश आहे. जो व्यक्ती अवघे दीड दिवस शाळेत गेला त्या व्यक्तीची साहित्य संपदा विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी ठेवण्यात आली हा आधुनिक युगातील एक चमत्कार आहे. म्हणूनच अण्णाभाऊ हे आधुनिक युगातील साहित्यरत्न आहे. त्यांच्या काही कादंबऱ्यांवर चित्रपटही निघाले. उपेक्षित गुन्हेगार म्हणून कलंकित ठरवले गेलेले दलित आणि श्रमिक यांच्या समृद्धीचे स्वप्न अण्णाभाऊ पाहत होते. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या लढाऊ आणि विमोचक विचारांचे संस्कार त्यांच्या मनावर खोलवर झालेले होते. जग बदल घालुनी घाव! सांगून गेले मज भीमराव! हे त्यांचे गीत खूप गाजले. माझी मैना गावाकडं राहिली... ही त्यांची लावणी तर अविस्मरणीय आहे. पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती दलितांच्या तळहातावर तरलेली आहे असे ते नेहमी म्हणत. मानवी जीवनातील संघर्ष, नाट्य, दुःख, दारिद्र्य त्यांच्या साहित्यातून प्रकट होते. जगातील सत्तावीस भाषांमध्ये अण्णाभाऊंच्या साहित्याचे भाषांतर झाले आहे. १९५७ साली झालेल्या दलित साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते. महाराष्ट्रातील विद्यापीठांत अण्णाभाऊंवर अकरा प्रबंध प्रसिद्ध केले गेले आहेत. पुणे विद्यापीठात त्यांच्या सन्मानार्थ अण्णाभाऊ साठे अध्यासन सुरू करण्यात आले आहे. असा हा पदादलितांच्या जीवनावर वास्तव लिहिणारा साहित्यरत्न १८ जुलै १९६९ रोजी कालवश झाला. आज त्यांची १०५ वि जयंती त्यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

# साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे : जागतिक दृष्टिकोनाचे अजरामर दीपस्तंभ

साहित्य म्हणजे केवळ शब्दांची मांडणी नव्हे, तर काळाच्या चक्रात अस्वस्थ करणाऱ्या प्रश्नांची शोध यात्रा असते. महाराष्ट्राच्या पावन भूमीमध्ये जन्मलेले साहित्यरत्न,लोकशाहीर अण्णा भाऊ साठे हे असे लेखक होते, ज्यांनी आपल्या लेखणीने वाटेगाव ते रशियापर्यंतचा प्रवास केला. सामाजिक समतेसाठी लढणाऱ्या भारताच्या कार्यकर्त्यांचा चेहरा, आवाज आणि आत्मा साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातून प्रकट झाला. बंगालची हाक, तेलंगणाचा संग्राम, पंजाबचा दंगा, गोवा मुक्तिसंग्राम, दिल्ली आणि महाराष्ट्र या भारतातील प्रमुख प्रदेशांमधील ऐतिहासिक घडामोडींवर अण्णा भाऊ साठे यांनी केलेले चिंतन हे विलक्षण सखोल आणि समर्पित होते. या भौगोलिक व सांस्कृतिक विश्लेषणामध्ये त्यांनी केवळ संघर्षाचे वर्णन केले नाही, तर या प्रदेशांची भारताच्या अखंडतेतील भूमिका अधोरेखित केली. ''भारतभूमीची एकता, अखंडता, समानता आणि नागरिकांचे आनंदी आयुष्य हे अण्णा भाऊंच्या लेखनाचे मर्म आहे. त्यांच्या लिखाणातून एक राष्ट्रीय आणि मानवीकल्याणवादी स्वप्न सतत झळकत राहते.



अण्णा भाऊ साठे : जागतिक तत्त्ववेत्ते आणिसांस्कृतिकराजनैतिकविश्लेषक: अण्णा भाऊ साठे हे केवळ भारतापुरते मर्यादित नव्हते, ते जागतिक विचारांचे तत्त्ववेत्ते होते. त्यांनी लिहिलेला स्टॅलिनग्राडचा पोवाडा, बर्लिनचा पोवाडा हे याचे ठोस उदाहरण आहेत. जर्मनी, रशिया, पाकिस्तान यासारख्या देशांतील तत्कालीन राजकीय परिस्थितीचा त्यांनी अभ्यासपूर्ण आढावा घेतला आणि भारताशी त्यांचे संबंध, परिणाम व परस्पर प्रभाव यांचा सांस्कृतिक व सामाजिक विश्लेषणातून विचार केला. ही दृष्टी आजही आपल्याला थक्क करणारी आहे.त्यांच्या काळातील इतर मराठी लेखकांच्या तुलनेत राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर सतत विचार करून लेखन करणारे अण्णा भाऊ साठे हे कदाचित एकमेव मराठी साहित्यिक असावेत. ही त्यांची वैशिष्ट्यपूर्ण आणि अग्रगामी भूमिका त्यांच्या लेखनातून सतत जाणवते. त्यामुळेच त्यांना केवळ दलितांचा साहित्यिक म्हणून नव्हे, तर जागतिक मानवतावादी लेखक,तत्त्ववेत्ता म्हणूनही आपण पाहिले पाहिजे.

महाराष्ट्र शासनाचा उपक्रम : अण्णा भाऊ साठे साहित्याचे पुर्नप्रकाशन अण्णा भाऊ साठे यांच्या समग्र कार्याचा व्यापक परिचय नव्या पिढीला व्हावा, म्हणून महाराष्ट्र शासनाव्दारे 'साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समितीची स्थापना दि.१६ जून,२०१४ झाली. मी स्वतः या समितीचा अध्यक्ष म्हणून कार्य करतो आणि मला अभिमान आहे की, या समितीच्या वतीने तीन टप्प्यांत अण्णा भाऊ साठे यांच्या निवडक साहित्याचे पुर्नपप्रकाशन करण्यात आले आहे आणि हे खंड अत्यल्प दरात वाचकांसाठी उपलब्ध करून दिले आहेत. या विविध खंडांमध्ये त्यांच्या महत्त्वाच्या कादंबऱ्या, कथा, आत्मकथनपर साहित्य, लोकनाट्य, प्रवासवर्णन, गीते व कविता यांचा समावेश आहे. हे सर्व साहित्य सर्वसामान्य लोकांपर्यंत सहज आणि सुलभ स्वरूपात पोहोचवण्याचा शासनाचा दृढ निर्धार आहे.

नव्या तंत्रज्ञानातील साहित्यप्रवाह: डिजिटल युगाच्या गरजेनुसार अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य ऑडिओबुक्स आणि ई-बुक्स स्वरूपातही शासनाच्या वतीने मोफत उपलब्ध करून दिले आहे. त्यामुळे आजच्या तरुण पिढीला अण्णा भाऊ साठे यांचे विचार आणि शब्द कधीही, कुठेही ऐकता-वाचता येतात. त्यांच्या साहित्यातील ऊर्जा ही आजही तितकीच जिवंत, संघर्षशील आणि प्रेरणादायी आहे.

राष्ट्रप्रेमाचा झंझावाती आवाज: अण्णा भाऊ साठे हे आपल्या लेखणीतून सामाजिक क्रांतीचा मंत्र देणारे लेखक होते, पण त्यांची राष्ट्रभक्ती देखील तेवढीच ठोस होती. त्यांनी आपले साहित्य केवळ वर्ग संघर्षापुरते मर्यादित ठेवले नाही, तर राष्ट्रहित आणि लोकशाही मूल्यांचे संवर्धन हेच केंद्रबिंदू मानले. त्यामुळे त्यांचे लेखन सामाजिक न्याय आणि राष्ट्रप्रेम यांचा सुवर्ण संगम आहे. मी का लिहितो याबद्दल अण्णाभाऊ आपल्या ' वैर ' या कांदबरीच्या प्रस्तावनेत म्हणतात,''आपण सतत लिहित राहावे, जुन्या चालीरीती दूर कराव्यात आणि जुन्या पण लोप पावलेल्या प्रगत प्रथांना पुन्हा पुढं आणाव,हेवे दावे,दुष्टावे, वैर याचा घोर परिणाम दाखवावा आणि या नव महाराष्ट्रात सलोखा वाढवा,जनता सुखी व्हावी, संपन्न व्हावी आणि महाराष्ट्रातील विषमता नष्ट झालेली पहावी अशी दृढ श्रध्दा घेऊन मी लिहितो.''असे स्वप्न अण्णाभाऊंनी पाहिले. लेखाचा समारोप करताना हे नक्कीच म्हणावे लागेल की, सर्व भारतीयांची मान अभिमानाने उंचावेल अशी कामगिरी साहित्यरत्न,अण्णाभाऊ साठे यांनी केली ,यामुळे त्यांचे साहित्य जगभरात पोहोचले. मराठीचा सातासमुद्रापार झेंडा फडकवला गेला आणि याची परिणीती अण्णाभाऊ साठे यांचा अर्धाकृती पुतळा महाराष्ट्र शासन मुंबई विद्यापीठ आणि रशियातील मार्गारिटा रुडामिनो विद्यापीठांच्या भव्य प्रांगणामध्ये संयुक्त उपक्रमांमधून मॉस्को या ठिकाणी उभारला गेला. यामुळे अण्णा भाऊ साठे हे केवळ दलित साहित्याचे आधारस्तंभ नव्हते तर ते एक व्यापक जागतिक दृष्टीकोनातून चिंतन करणारे मानवतावादी,समतावादी साहित्यिक होते म्हणून त्यांचे साहित्य नव्या माध्यमांतून, नव्या पिढ्यांपर्यंत पोहोचवणे हे आपले कर्तव्य आहे. म्हणून अण्णाभाऊंच्या ८कांदब-याचे हिंदी मध्ये , ३० कांदब-याचे इंग्रजी मध्ये, आणि २ पुस्तकांचे तमिळ भाषेत भाषांतर करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या प्रकल्पासही महाराष्ट्र शासनाचे सहाय्य असेल. शासनाच्या वतीने अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यास अजरामर करण्याचा उपक्रम राबवला जात आहे. तो एक सांस्कृतिक आणि बौद्धिक चळवळ आहे. यामध्ये सहभागी होणं म्हणजे अण्णा भाऊ साठे यांच्या स्वप्नातील समतेच्या भारतासाठी योगदान देणं होय,असे मला वाटते.



**चंद्रकांत दादा पाटील**
**उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य, अध्यक्ष-साहित्यरत्न ,लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, चरित्र साधने प्रकाशन समिती**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# हत्ती गुजरातला हलवला पाहिजे, तेथून शंकेला सुरुवात, काँग्रेस आ. सतेज पाटील यांची प्रतिक्रिया : नांदणी येथील मठाला दिली भेट



दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** गेले अनेक वर्ष ही केस न्यायालयाकडे होती. दुर्दैवाने पेटाने एचपीसीकडे अर्ज केला की, हा हत्ती गुजरातला हलवला पाहिजे, तेथून शंकेला सुरुवात होते. अशी प्रतिक्रिया काँग्रेसचे आमदार सतेज पाटील यांनी माध्यमांशी बोलताना दिली. तसेच त्यांनी नांदणी येथील मठाला दिली भेट दे देऊन आपल्या भावना व्यक्त केल्या.

एखाद्या प्राण्याची व्यवस्था नीट होत नसेल, तर पेटा त्या संदर्भात आपले मत मांडत असते. मत मांडताना तो हत्ती गुजरातला गेला पाहिजे, ही भूमिका पेटाने घेतली होती.त्यानंतर डॉक्टरांनी येऊन हत्तीची तब्येत चांगली असल्याचा अहवाल दिला. हायकोर्टाने पहिल्या टप्प्यात स्थगिती दिली होती. दुसऱ्या टप्प्यात काही अडचणी आल्या. त्यानंतर सुप्रीम कोर्टाने ताबडतोब हत्ती देण्याची भूमिका घेतली, आणि पोलीस बंदोबस्तात ही कारवाई करण्याचा आदेश दिला. यामुळे जैन समाज, हिंदू धर्माच्या भावना दुखावण्याचा काम या सगळ्या प्रकरणात झाले आहे. गेली ३० वर्षाहून अधिक काळ मठाने ज्या हत्तीची जपणूक केली, तो घेऊन जाण्याचे पाप या मंडळींनी केलं आहे. याबाबत एक गुगल फॉर्म काढण्यात आला असून, याद्वारे राष्ट्रपतींना विनंती केली जाणार आहे. सुप्रीम कोर्टाने निर्णय देऊन आमचे हात बांधले आहेत. त्यामुळे राष्ट्रपतींनी यात हस्तक्षेप करावा आणि आमचा हत्ती परत द्यावा, अशी आमची कोल्हापूरकर म्हणून अपेक्षा आहे. देवेंद्र फडणवीस मदतीचा शब्द यावर बोलताना आमदार सतेज पाटील म्हणाले की, मुख्यमंत्र्यांनी ६ महिन्यांपूर्वी बोलण्याचा अनुभव लोकांना आलेला आहे की, काय मदत केली आणि काय नाही.आमची सरकारकडून अपेक्षा आहे की, त्यांनी यामध्ये त्वरित हस्तक्षेप करावा. उद्या मठाचे कामकाज व्यवस्थित नाही, म्हणून तुम्ही मठाबाबत देखील वेगळ्या भूमिका घेऊ शकता. वेगळ्या पद्धतीने काहीतर षडयंत्र चाललं आहे,असं वाटतं. हत्तीच्या माध्यमातून ही फक्त सुरुवात आहे. मालेगाव प्रकरणात निकालामध्ये काय झालं बघावं लागेल. गेल्या १५ -२० वर्षात वेगवेगळ्या अधिकाऱ्यांनी त्याचा तपास केला. न्यायालयात त्यांनी म्हणणं मांडले, यामध्ये काही त्रुटी राहिल्या का, हे बघावं लागेल. विस्तृतपणे निकाल आल्यावर कळेल की, नेमकं काय घडलं. मुख्यमंत्री महोदयांनी वक्तव्य करताना विचार करायला हवा होता की, कुठलीही कारवाई ही पोलीस खाते करत असते.एटीएस ने ही कारवाई केली एनआयएने त्यावेळी हा तपास केला, त्यांच्या सगळ्या प्रमुखांवर तुम्ही शंका घेता का?२००८ मध्ये जेव्हा या सगळ्या गोष्टी घडल्या, तेव्हा अजित पवार आमच्या बरोबर होते. महादेवी हत्तीण सह्यांची मोहीम सुरु केल्यानंतर देशभरातून आणि परदेशातून फोन येत आहेत. लोकांच्या भावना तीव्र आहेत, म्हणून दोन दिवसात सह्यांची निवेदने राष्ट्रपतींना पाठवणार आहोत. हत्तीबाबत लोकप्रतिनिधी २१ जुलैला नांदणीचे शिष्टमंडळ माझ्याकडे आले होते. त्याचवेळी मी माझी भूमिका घेतली होती.आमची भूमिका समाज, हत्ती आणि मठाच्या बाजूने आहे. अशी प्रतिक्रिया आमदार सतेज पाटील यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

## महादेवी हत्तीणीबाबत सरकारने स्पष्ट भूमिका घेणे गरजेचे : आमदार जयंत पाटील



**कोल्हापूर/प्रतिनिधी :** महादेवी हत्तीण ७०० वर्षांची परंपरा खंडित करण्याचे काम कायद्याच्या माध्यमातून झाले आहे. हत्ती इथेच राहावा, यासाठी सरकारने स्पष्ट भूमिका घेणे गरजेचे आहे.असे मत आमदार जयंत पाटील यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले. यावेळी ते म्हणाले की,केरळ सारख्या राज्यात तिथला हत्ती बाहेर जात नाही, महादेवीसाठी सुद्धा बंधने घातली असती, तर इथला हत्ती बाहेर गेला नसता. ७०० गाव असलेल्या या मठाच्या अधिपत्यात ही परंपरा चालू आहे. परंपरा मोडल्यामुळे सर्वच नाराज आहेत.३२ शिराळ्याच्या नागपंचमीला जी भूमिका घेतली. तीच भूमिका महादेवी हत्तीबाबत घ्यावी. याबाबतीत सकारात्मक भूमिका सरकारने घेतली असती, तर हा प्रसंग टळला असता. सुप्रीम कोर्टापर्यंत जाऊन सुद्धा यश आलेले नाही,इथला हत्ती जाणार नाही अशी या शांतता प्रिय जनतेची भूमिका होती. मात्र, तसं झालं नाही. हत्ती परत यावा यासाठी चा लढा यापुढेही तीव्र होईल असे मला वाटते.सुप्रीम कोर्टाकडून न्याय मिळाला नसला, तरी राष्ट्रपती अशा निर्णयामध्ये मध्यस्थी करू शकतात. त्यामुळे अजूनही महादेवी हत्तीणीबाबत आम्ही आशावादी आहोत.आम्हाला कोर्टाचा अवमान करायचा नाही. मात्र नांदणीच्या ७०० वर्षांच्या परंपरेबाबत असं होत असेल, तर मठाधिपती लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून लढा सुरू ठेवला जाईल. असे ते म्हणाले. तसेच मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणावर प्रतिक्रिया देताना म्हणाले की, न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. त्यावर काही भाष्य करू इच्छित नाही. तुमच्या मनात आहे, तीच शंका जनतेच्या मनात ही आहे. कोर्टाचा अवमान होईल असं बोलणार नाही, मात्र आता निकाल झालेला आहे.असे मत आमदार जयंत पाटील यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

## स्वस्तात सोने सांगून आठ लाखांची हातोहात फसवणूक

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** नवी मुंबईतील सानपाडा येथे राहणाऱ्या एका व्यक्तीला स्वस्तात सोने देण्याचे आमिष दाखवून ८ लाखांची फसवणूक केल्याचे समोर आले आहे. प्रत्यक्ष देवाण घेवाण वेळी पैसे घेत सोने न देता संशयित निघून गेले होते. . याबाबत सानपाडा पोलीस ठाण्यात संबंधित पाच अनोळखी व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विनय नगर मीरा रोड येथे राहणारे प्रेम भानुशाली या २२ वर्षीय युवकाच्या संपर्कात राकेश, राजेश, खन्ना, राजू हे संपर्कात आले होते. त्यांनी प्रेम यांना स्वस्तात सोने मिळू शकते इच्छा असेल तर सांगणे असे सांगितले. या आमिषाला बळी पडत प्रेम यांनी सोने घेण्याचे ठरवले. यासाठी पैशांची जुळवा जुळव करीत आठ लाखांची रोकड जमा केली. त्यांची बोलणी फ ेब्रुवारी २०२५ पासून सुरु होती. शेवटी पैशांची जमवा जमव केल्या नंतर सोने दाखवा असे प्रेम यांनी सांगितल्यावर सध्या जवळ नाही. असे राकेश याने सांगितले.

## ‘साहित्य रंग’ भाग - १७, लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला...

### विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या संकल्पनेवर एक दर्जेदार साहित्यिक पर्व

दैनिक आपला विदर्भ

■ उदय नरे

**मुंबई :** मिती ग्रुप प्रस्तुत आणि महाराष्ट्र विधान परिषदेच्या मा. उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या विशेष पुढाकारातून साहित्य, कविता आणि विचारांची मेजवानी देणारे ‘साहित्य रंग’ या डिजीटल व्यासपीठाचा १७ वा भाग ०१ जुलै २०२५ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. सायंकाळी ७ वाजता हा कार्यक्रम मिती ग्रुप डीजिटलच्या युट्यूब चॅनेलवर प्रसारित होणार आहे.

साहित्यप्रेमींसाठी ही मोठी आनंदाची बातमी आहे. या भागात लेखक आशुतोष जावडेकर व कवयित्री पूजा भडांगे आपले साहित्यिक विचार, कविता आणि रचना सादर करणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उत्तरा मोने या करणार असून, नेहमीप्रमाणे रसिकांशी संवाद साधणारी ही मालिका साहित्यप्रेमींसाठी एक पर्वणी ठरणार आहे.

‘साहित्य रंग’ ही मालिका डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या साहित्यिक जाणिवेचा आणि नव्या लेखक-कवींसाठी उभारलेल्या व्यासपीठाचा उत्तम नमुना आहे.

रसिक प्रेक्षकांना हा कार्यक्रम खालील लिंकवर पाहता येईल

लिंक :




https://www.youtube.com/@mitigroupdigital8928

## मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणात जसं राज्य सरकार सुप्रीम कोर्टात गेलंय, तसचं मालेगाव प्रकरणातही जावं : राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांची प्रतिक्रिया

दैनिक आपला विदर्भ



**नवी मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणात जसं राज्य सरकार सुप्रीम कोर्टात गेलंय, तसचं मालेगाव प्रकरणातही जावं.अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी ते म्हणाले की,मुंबई बॉम्ब ब्लास्ट आणि मालेगाव बॉम्ब ब्लास्ट मधील सर्व आरोपी सुटलेले आहेत. काही त्रुटी असल्यास कोर्ट एका बाजुला सांगतोय. बॉम्बस्फोट झाला हे सिद्ध करण्यात पोलिसांना यश आलंय. परंतु,बॉम्बस्फोट झाल्यानंतर ते कोणी केला हे सिद्ध करण्यात काही त्रुटी असेल तर, सरकारने त्या त्रुटी दूर करून या संदर्भात सुप्रीम कोर्टात अपील करणे गरजेचे आहे. अशा पद्धतीने झालं नाही तर महाराष्ट्रात किंवा देशांमध्ये कुठेही आम्ही बॉम्ब स्पोट केला. तर, आम्ही पुराव्या अभावी सुटू शकतो. हा संदेश जाईल आणि भीतीचं वातावरण होईल म्हणून सरकारने याची काळजी घ्यावी. मुंबई बॉम्बस्फोट निकाल प्रकरण राज्य सरकार सुप्रीम कोर्टात गेलाय तस या निकाला विरोधात राज्य सरकार कोर्टात जात का हे आम्हाला पाहायचं आहे.सुप्रीम कोर्टाच्या आदेशाप्रमाणे गरिबांची स्थानिक भूमिपुत्रांची जी घर आहेत. त्याला पाडण्याच्या नोटिसा दिलेले आहेत.लोकांमध्ये भीतीचं वातावरण आहे. पावसाळ्यानंतर कारवाई होऊ शकते म्हणून शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने हा मोर्चा काढण्यात येतोय. मोर्चा काढण्याचा उद्देश स्पष्ट आहे. आमची गरज जी आहे.काल गायरान जमिनी नियमित करण्याचा निर्णय घेण्यात आला तशीच ही गरज सुद्धा नियमित करावीत अशी आमची मागणी आहे. दुसरा मुद्दा हा आहे. की सरकवणे गरिबांसाठी घर काढले आणि बाजारभावाप्रमाणे घर देण्याचा निर्णय घेतलाय. त्यामुळे गरिबांची गरज गरिबांनाच मिळाली पाहिजे म्हणून हा मोर्चा आहे. अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

## सुपारी घेऊनच माधुरी हत्तीण वनताराकडे; हाय पावर कमिटीटीचाही सहभाग

### माजी खासदार राजू शेट्टी यांची पत्रकार परिषदेत आरोप

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** कायदा वाकवून अन्याय केला जातो, याच उदाहरण म्हणजे माधुरी हत्तीण वनताराकडे नेणे. माझ्याकडे नांदणी मठाच्या माधुरी हत्तीणीची तब्येत चांगली असल्याची वैद्यकीय अधिकाऱ्यांची अनेक पत्रं आहेत. माधुरी हत्तीण वनताराकडे नेण्यासाठीच पेटा काम करत होतं. पेटाची भूमिका प्रामाणिक असती, तर त्यांनी वनतारा सोडून अन्य ठिकाणी हत्तीण पाठवली असती. सुपारी घेऊनच माधुरी हत्तीण वनताराकडे पाठवण्यासाठी हाय पावर कमिटी काम करत असल्याची शंका आहे. असा आरोप माजी खासदार राजू शेट्टी यांनी पत्रकार परिषदेत केला. यावेळी ते पुढे म्हणाले की, पेटा स्थापन होण्यापूर्वीपासून माधुरी हत्तीण या मठात आहे.वनताराचे आकर्षण वाढवण्यासाठी माधुरी हत्तीण नेण्याचे काम केले आहे. माझे जुन पत्र ही त्यांनीच व्हायरल केले आहे. अंबानीला हत्तीची गरज का आहे? हे कळेना झाले आहे. पेटाच्या भूमिकेमागे आर्थिक देवाणघेवाण असण्याची शक्यता आहे. पोलीस देखील सूडबुद्धीने त्रास देत आहेत. रात्री अपरात्री संशयिताच्या घरी जात आहेत.नातेवाईकांकडून पोलीस लिहून घेत आहेत. पोलीस दडपशाही करत असतील तर, पोलिसांनी हीच तत्परता जिल्ह्यात अंमली पदार्थ तस्करीत दाखवावी.अंबानीची पाकिटं पोलिसांपर्यंत आली आहेत का? असा संशय आहे. कोर्टाचा वापर करून कोर्टाची दिशाभूल करून माधुरीला घेऊन गेले आहेत. मात्र, आता आम्ही गप्प बसणार नाही. माधुरीला परत आणणारचं आहे. सरकार अंबानीचं बटीक व्हायला लागले आहे. एक रविवार माधुरीसाठी मोहीम राबवण्यात येणार आहे.येत्या रविवारी नांदणी मठ ते कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालय मूक मोर्चा काढणार आहे.



जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपतींना निवेदन देण्यात येणार आहे. आजपर्यंत वनताराकडे किती जंगली प्राणी आणले गेलेत, किती प्राणी सक्षम आहेत? मृत्यू झालेल्या प्राण्यांचा अंत्यविधी वनअधिकाऱ्यांसमोर करण्यात आला आहे काय? याची माहिती पुढे आली पाहिजे. मुंबई बाँबस्फोट आणि मालेगाव बाँबस्फोट मधील आरोपी निर्दोष सुटले आहेत. मग बाँबस्फोट केले कोणी? बाँबस्फोट नैसर्गिक होत नाहीत.अशी प्रतिक्रिया माजी खासदार राजू शेट्टी यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

# संक्षिप्त...

## माझा न्यायव्यवस्थेवरती पूर्ण विश्वास आहे - रोहिणी खडसे



दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** सगळ्या वकील टीमचे आभार व्यक्त करते, खूप चांगल्या रीतीने न्यायालयासमोर बाजू मांडली. हा सगळा न्यायप्रविष्ठ विषय आहे. आणि माझा न्यायव्यवस्थेवरती पूर्ण विश्वास आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे आज काही सविस्तर बोलणार नाही.अशी प्रतिक्रिया रोहिणी खडसे यांनी माध्यमांशी बोलताना दिली. तर, सर्व युक्तिवाद ऐकून घेत न्यायालयाने आज न्यायालयीन कोठडी दिली आहे. लवकरच जामीनासाठी अर्ज करू. परिवाराशी चर्चा करू.आणि जामीनासाठी अर्ज करू. ज्या कारणासाठी पोलीस कोठडी मागण्यात आली होती, ती कारण चुकीची होती. तो तपास करण्यासाठी पोलीस कोठडीची आवश्यकता नाही, असा युक्तिवादात आम्ही केला. सर्व मोबाईल आणि संभाषण पहिल्या दिवशी पोलिसांनी जप्त केली आहेत. या चौकशीसाठी पोलीस कोठडीची गरज नाही.अशी प्रतिक्रिया प्राजंल खेवलकर प्रकरणावर आरोपीचे वकीलांनी दिली.

## मला गद्दार म्हणणारे तेच गद्दार निघाले; कैलास गोरंट्याल यांच्या भाजप प्रवेशावर खोतकर यांची प्रतिक्रिया



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** अगोदर याचे या लोकांशी अनैतिक संबंध होते, आता याने घरोबा केला. महानगरपालिकेत कैलास गोरंट्याल यांनी केलेल्या भ्रष्टाचाराची चौकशी सुरू आहे. ही चौकशी लपवण्यासाठी यांनी हा डाव टाकला आहे. एकटं लढण्याची घोषणा कैलास गोरंट्याल यांनी केली. आमचीही तयारी आहे. कैलास गोरंट्याल यांची तुलना खाटीक आणि बोकडाशी केली. कैलास गोरंट्याल यांच्या भाजप पक्ष प्रवेशात नावं घेतलेले दोन जण माझ्यासोबत आहेत. खोटा प्रचार करण्याची यांची सवय आहे. मला गद्दार म्हणणारे तेच गद्दार निघाले.अशी प्रतिक्रिया कैलास गोरंट्याल यांच्या भाजप प्रवेशावर आमदार अर्जुन खोतकर यांनी दिली.

## भोंगे मुक्त नाशिक संदर्भात आयुक्तांची भेट भाजप नेते किरीट सोमय्या यांची माध्यमांशी बोलताना माहिती



**नाशिक/प्रतिनिधी :** भोंगेमुक्त नाशिक संदर्भात आयुक्तांची भेट घेण्यात आली आहे. अशी माहिती भाजप नेते किरीट सोमस्या यांनी माध्यमांशी बोलताना दिली. माध्यमांशी बोलताना ते म्हणाले की,भोंगा मुक्त मुंबई झाली आता भोंगा मुक्त महाराष्ट्र होणार आहे. सकाळी संभाजी नगर येथे गेलो होतो आता उर्वरित ठिकाणी जाऊन भेट घेणार आहो. नाशिक पोलिसांनी सांगितलं सर्व भोंग्यांवर प्रतिबंध लावला आहे. नाशिकमध्ये बांगेवरून आवाज बंद झाला आहे. काही आठवड्यात पुढील भोंगे काढणार आहेत. पुढच्या आठवड्यात नाशिक भोंगे मुक्त होणार आहे. देशात ध्वनी प्रदूषण कायदा आहे.रात्री अकरा ते सकाळी ६ पर्यंत भोंगे वापरता येत नाहीत. कायदा आणि सुव्यवस्थेसाठी चालेल मात्र, त्याचा दुरुपयोग होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. राहुल गांधी आणि सोनिया गांधी यांनी यातून धडा घेतला पाहिजे. निकाल लागल्यानंतर टीका केल्याचे धाडस करत आहेत. मालेगाव बॉम्बस्फोट निकाल आज आला आहे. खरे आरोपी कोण होते त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न झाला नाही.काँग्रेसने हे हिंदू आतंकवाद म्हणून ही दृश्य उभे केले होते.त्यांना अजून पश्चात्ताप नाही झालेला. कधी तरी कोणी तरी गांधी परिवाराला आणि सरकारच्या एजनसीला प्रश्न विचारता का असा प्रश्न यावेळी त्यांनी केला. तसेच त्यांनी जे लव्ह जिहाद केले. लेंड जिहाद केले. त्याची किंमत त्यांना विधानसभा निवडणुकीत दिसून आली. असे मतही यावेळी भाजप नेते किरीट सोमय्या यांनी माध्यमांशी बोलतांना व्यक्त केले.

## विविध वृत्त...

### पालकमंत्री ना.मकरंद पाटील यांचा जिल्हा दौरा



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील हे दोन दिवशीय दि. १ व २ ऑगस्ट २०२५ रोजी बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. दौऱ्यादरम्यान ते अतिवृष्टी भागाची पाहणी व नैसर्गिक आपत्ती बाबत आढावा घेणार आहे.

त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार दि. ३१ जुलै रोजी सायंकाळी ५.३० वाजता मुंबई येथून ता. लोणार जि. बुलढाणाकडे रवाना. शुक्रवार दि. १ ऑगस्ट रोजी रोजी रात्री १ वाजता शासकीय विश्रामगृह, लोणार येथे आगमन व राखीव. त्यानंतर सोईनुसार अतिवृष्टी भागाची पाहणी. सायंकाळी ४ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे नैसर्गिक आपत्ती बाबत आढावा बैठक. बैठकीनंतर शासकीय विश्रामगृह बुलढाणा येथे आगमन व राखीव. शनिवार दि.२ ऑगस्ट रोजी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी कार्यकर्ता बैठक. त्यानंतर सोईनुसार पुणेकडे रवाना होतील.

### उर्जा राज्य मंत्री मेघना बोर्डीकर यांनी दिले उमरखेड, महागाव मतदारसंघात रोहित्र बसविण्याचे व मनुष्यबळ वाढविण्याचे निर्देश




**उमरखेड/प्रतिनिधी :** जनतेच्या सुरक्षिततेसह अखंड व दर्जेदार वीजपुरवठा ही शासनाची प्राथमिकता आहे. यासाठी प्रशासनाने तत्परता व कार्यक्षमतेने काम करावे असे निर्देश देत उमरखेड, महागाव मतदारसंघात गरजेच्या ठिकाणी रोहित्र बसविण्याचे व मनुष्यबळ वाढविण्याचे निर्देश उर्जा राज्य मंत्री मेघना बोर्डीकर यांनी दिले. उमरखेड आणि महागाव (जिल्हा यवतमाळ) तालुक्यांतील ऊर्जा विभागाच्या कामकाजाचा आढावा संदर्भात ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली एमएसईबी होल्डिंग कंपनीच्या फोर्ट येथील कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी आमदार किसनराव वानखेडे यांच्यासह उर्जा विभागाचे वरिष्ठ अधिकारी व नितीन भूतडा भाजपा यवतमाळ –पुसद समन्व्यक उपस्थित होते.

### देशाच्या संरक्षणावर व सैन्यावर कॉंग्रेसने राजकारण करु नये- मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांची प्रतिक्रिया

**नांदेड/प्रतिनिधी :** मालेगाव बॉम्ब स्फोटप्रकरणात कोर्टाने सक्षम पुरावे तपासून निर्णय दिला आहे. याबाबतीत जास्त बोलणे संयुक्तिक होणार नाही, अशी प्रतिक्रिया मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी ते म्हणाले की,कॉंग्रेसकडे विकासाचे मुद्दे नसल्यामुळे अल्पसंख्यांकांना भीती दाखवण्याचे काम करत आली आहे. मागील अनेक वर्षांपासून अल्पसंख्यांकांच्या मतांसाठी असे राजकारण कॉंग्रेस करत आहे, असा आरोप देखील मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी केला आहे. ऑपरेशन सिंदूरवर सगळ्या जगाचे लक्ष लागून होते. आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकुशलतेमुळे पाकिस्तानला माघार घ्यावी लागली. यामुळे विरोधकांकडून या ऑपरेशन सिंदूरवर प्रश्न उपस्थित करणे चुकीचे असल्याचे देखील मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी सांगितले. मंत्री शिवेंद्रराजे भोसले दोन दिवसीय नांदेड दौऱ्यावर आले आहेत. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना बोलत होते.

### रस्त्यावरील खड्ड्यात अपघात होऊ नये; म्हणून वाहतूक पोलीस कर्मचारी राहिले खड्ड्यातच उभे

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** जिल्हाधिकारी कार्यालय शेजारील चांदणे चौकात मोठा खड्डा आहे. त्या खड्ड्यात एखादे वाहन जाऊन मोठी दुर्घटना होऊ नये, म्हणून तेथे तैनात असलेले वाहतूक पोलीस थेट खड्ड्यात उभे राहून वाहनांना वाट करून देत होते. एकीकडे महानगरपालिकेचे दुर्लक्ष यामुळे शहरातील सर्वच रस्त्यांवर मोठ मोठे खड्डे झाले आहेत. ते खड्डे बुजवण्यात मनपा प्रशासन दुर्लक्ष करत आहे. तर दुसरीकडे मात्र वाहनधारक पादचारी यांना जीव मुठीत घेऊन चालावे लागत आहे. अशा परिस्थितीत पोलीस कर्मचारी आपले कर्तव्य बजावत असताना रस्त्यातील खड्ड्यात कोणी पडू नये व दुर्घटना होऊ नये, म्हणून वाट करून देत असल्याचे चित्र जिल्हाधिकारी कार्यालय शेजारील चांदणे चौकात पाहायला मिळाले.

# नागरे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग राबविते गेल्या दहा वर्षापासून स्वच्छतेचा अनोखा उपक्रम

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप




**बिबी :** दूसरबीड दिनांक २४ संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या राष्ट्रीय योजना विभागाच्या अंतर्गत नारायणराव नागरे महाविद्यालय मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे युनिट कार्यरत आहे या विभागाच्या माध्यमातून विविध स्वरूपाचे समाज उपयोगी उपक्रम राबविले जातात भगवान बाबा शिक्षण प्रसारक मंडळ रूम्हणा चे सचिव शिवराज कायंदे हे संत गजानन महाराज शेगावचे भक्त असल्याने त्यांच्या कल्पनेतून स्वच्छतेचा संदेश देण्याकरिता नारायणराव नागरे महाविद्यालयातील कर्तव्यदक्ष प्राचार्य तथा राष्ट्रीय योजना कार्यक्रम अधिकारी तसेच आधी सभा व्यवस्थापन परिषद सदस्य संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ डॉक्टर विजय नागरे हे संत गजानन महाराज यांच्या दिंडी परतीचा प्रवास सिंदखेड राजा किनगाव राजा दुसर बीड लोणार या मार्गाने जाते महाविद्यालयाच्या वतीने तढेगाव फाटा ते नगर माळ या चार किलोमीटर अंतरामध्ये खूप मोठ्या प्रमाणात भाविक भक्त दर्शना करीता येत असतात त्यामुळे प्लॅस्टिक कागद कचरा मोठ्या प्रमाणात रस्त्यावर पडतात ते स्वच्छ करण्याकरिता संस्थेचे सचिव व त्यांच्या सौभाग्यवती प्रा. धनश्री कायंदे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने या स्वच्छतेच्या मोहिमेमध्ये सहभागी होतात राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी तथा प्राचार्य यांना स्वच्छते विषयी विचारले असता त्यांनी सांगितले की आम्ही महाविद्यालयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व समाजाला स्वच्छतेचा संदेश देण्याकरिता हा उपक्रम राबवित असतो तसेच महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्ताने स्थानिक दुसरबीड आठवडी बाजार भरत असल्याने त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात कागद प्लॅस्टिक कचरा पडतो तो सुद्धा उचलण्याचे व त्याचे निर्मूलन करण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक करतात या उपक्रमामध्ये डॉगणेश घुगे डॉ. दीपक देशमाने प्रा. सत्यम श्रीवास्तव प्रा. नयना गवारे प्रा.गजानन राठोड प्रा. देवानंद नागरे प्रा.महेश कायंदे प्रा.जगदीश यादव गजानन मुंडे अनिल रणबळे तसेच गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## नागरे महाविद्यालयाने संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने विद्यार्थिनींना एसटी बस मोफत पास

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप




**बिबी :** स्थानिक दुसर बीड संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या एसटी बस मोफत पास या योजनेच्या माध्यमातून नारायणराव नागरे महाविद्यालयातील विद्यार्थी विकास कक्षाच्या माध्यमातून या योजनेचा लाभ गाव खेड्यामधून येणाऱ्या गोरगरीब कुटुंबातील विद्यार्थिनींना होत असल्याचे भगवान बाबा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव शिवराजभाऊ कायंदे यांनी मत व्यक्त केले आहे व त्यांच्या हस्ते या मोफत एसटी बसचे वितरण करण्यात आले या योजनेचा लाभ संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.मिलिंद जी बारहाते यांच्या मार्गदर्शनातून तसेच विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ राजीव बोरकर यांच्या माध्यमातून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय नागरे व विद्यार्थी विकास विभागाचे समन्वय डॉक्टर गणेश घुगे यांच्या उपस्थितीमध्ये विद्यार्थिनींना वाटप करण्यात आले या एसटी बस पास मुळे ग्रामीण भागातून येणाऱ्या बी ए बी कॉम आणि बी एस्सी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थिनींना मोठ्या प्रमाणात लाभ होईल वर्गात उपस्थितीमध्ये सुद्धा वाढेल असे प्राचार्यांनी मत व्यक्त केले विद्यार्थी विकास विभागाचे समन्वय डॉ. गणेश घुगे डॉक्टर दीपक देशमाने प्रा. शिंदे प्राध्यापक तारे प्रा.नयना गवारे प्रा. मिलिंद गवई प्रा.शेख युनूस प्रा. देवानंद नागरे प्रा. शंकर मेहर प्रा.सर्जेराव वाघ श्री गजानन मुंडे श्री अनिल रनमळे विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## आर्वी तालुक्यात १ ते ७ ऑगस्ट दरम्यान महसूल सप्ताह

दैनिक आपला विदर्भ

**वर्धा/प्रतिनिधी :** आर्वी तहसील कार्यालयाच्यावतीने दि.१ ते ७ ऑगस्ट दरम्यान महसूल सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. त्यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी विश्वास शिरसाट व तहसीलदार हरीश काळे यांनी दिली.

महसूल सप्ताहाची सुरुवात दि. १ ऑगस्ट रोजी महसूल दिन साजरा करून होणार आहे. यावेळी महसूल विभागातील कार्यरत व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार, उत्कृष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांना पुरस्कार वितरण तसेच विविध योजनांच्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात येईल.

दिनांक २ ऑगस्ट रोजी २०११ पुर्वीपासून शासकीय जमिनीवर राहणाऱ्या पात्र कुटुंबांना त्यांच्या अतिक्रमित जागेचे पट्टे वाटप करण्याचा विशेष कार्यक्रम राबविण्यात येईल. दिनांक ३ ऑगस्ट रोजी पाणंदरस्ते, शेतरस्ते यांची मोजणी करण्यात येऊन रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात येईल. दि.४ ऑगस्ट रोजी प्रत्येक मंडळस्तरावर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबवले जाणार असून यात जनजागृतीपर उपक्रम, भाषणे आणि विविध प्रमाणपत्र वाटप याचा समावेश असेल.

दिनांक ५ ऑगस्ट रोजी विशिष्ट सहाय्य योजनेंतर्गत डीबीटी अर्थात डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर न झालेल्या लाभार्थ्यांना घरोघरी भेटी देऊन त्यांचे प्रलंबित लाभ सुरू करण्याबाबत काम केले जाईल व पात्र लाभार्थ्यांचे अर्ज स्विकारण्यात येतील. दि.६ ऑगस्ट रोजी शासकीय जमिनीवरील अतिक्रमण हटविणे आणि शासनाच्या धोरणानुसार शर्तभंग जमिनीबाबत नियमानूसार निर्णय घेण्याची कारवाई करण्यात येईल. वर्ग २ जमिनी वर्ग १ करणे याबाबत प्रत्येक लाभार्थी यांना मार्गदर्शन करून अर्ज भरून घेण्यात येतील.

महसूल सप्ताहाचा समारोप दि.७ ऑगस्ट रोजी होणार असून, त्या दिवशी एमसॅन्ड धोरणाची अंमलबजावणी, नवीन मानक कार्यप्रणालीची माहिती आणि महसूल विभागाच्या विविध योजनेचा आढावा घेत समारोप समारंभ पार पडणार आहे. या संपूर्ण सप्ताहात आर्वी तहसील कार्यालयामार्फत हेल्पडेस्क, व्हाट्सअॅप माहिती सेवा, माहितीपत्रके आणि स्थानिक माध्यमांद्वारे जनतेपर्यंत महसूल विभागाच्या योजनांची माहिती पोहोचविण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच, प्रत्येक दिवशी आयोजित कार्यक्रमात स्थानिक नागरिक, ग्रामपंचायत पदाधिकारी, तलाठी, मंडळ अधिकारी, पोलीस पाटील आणि कोतवाल यांचा सक्रीय सहभाग राहणार आहे. या दरम्यान सहभागी होऊन लाभ घेण्याचे आवाहन उपविभागीय अधिकारी विश्वास शिरसाट व तहसीलदार हरीश काळे यांनी केले आहे.

## जिल्हास्तर नेहरू कप हॉकी स्पर्धा; सहभागासाठी ३ ऑगस्टपर्यंत नोंदणी करा

**बुलढाणा/प्रतिनिधी :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने सन २०२५-२६ या वर्षासाठी जिल्हास्तर नेहरू कप हॉकी क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांमध्ये सबज्युनिअर (१५ वर्षांखालील मुले), ज्युनिअर (१७ वर्षांखालील मुले व मुली) अशा गटांचा समावेश आहे.

स्पर्धेचे आयोजन दि. ५ ऑगस्ट २०२५ रोजी सहकार विद्या मंदिर, बुलढाणा येथे करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शाळा/संघांनी आपली ऑफलाईन नोंदणी दिनांक ३ ऑगस्ट २०२५ पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, क्रीडा नगरी, जांभरून रोड, बुलढाणा येथे करणे आवश्यक आहे. नोंदणीसह संघांची यादी जोडणे बंधनकारक आहे. विहित मुदतीनंतर कोणत्याही संघाचा अर्ज स्वीकारला जाणार नाही.अधिक माहितीसाठी राज्य क्रीडा मार्गदर्शक (फुटबॉल) डॉ. जिवन मोहोड यांच्याशी संपर्क साधावा.

आवश्यक कागदपत्रे : पात्रता प्रमाणपत्र, जन्मदाखला (मूळ प्रत), आधार कार्ड, पासपोर्ट (मूळ प्रत), १५ वर्षाखालील खेळाडूंना वैद्यकीय प्रमाणपत्र अनिवार्य आहे.

प्रवेश अर्जावर खेळाडूचे संपुर्ण नाव, जन्मतारीख, वर्ग, आधार क्रमांक, शाळेचे नाव व पत्ता, शाळेचा यु-डायस क्रमांक, खेळाडूची स्वाक्षरी, रजिस्टर नंबर, मोबाईल क्रमांक, संस्था प्रमुख/मुख्याध्यापक यांची स्वाक्षरी आवश्यक राहिल. स्पर्धेत सहभागी खेळाडूंनी त्यांच्या वयानुसार योग्य कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे. राष्ट्रीय पातळीवर निवड झाल्यास खेळाडूंची वैद्यकीय तपासणी करण्यात येणार आहे. कोणत्याही प्रकारे वयोमर्यादा ओलांडल्याचे आढळल्यास संपूर्ण संघ बाद करण्यात येईल, याची सर्व संघांनी नोंद घ्यावी.

या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या कौशल्याची प्रचिती देण्यासह जिल्हास्तरावर प्रतिनिधित्व करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. तरी बुलढाणा जिल्ह्यातील शाळांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस. महानकर यांनी केले आहे.

# देसी पिस्टल व जिवंत काडतुसासह तीन दरोडेखोर जेरबंद मेहकर पोलिसांची कारवाई : ५१ हजाराचा मुद्देमाल जप्त

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** दरोडा घालण्याच्या उद्देशाने दबा धरून बसलेल्या तीन दरोडेखोरांना मेहकर पोलिसांनी मेहकर पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या मोळा रोड परिसरातील जामगाव शिवारातील ले आऊटमधील टिनपत्र्याच्या शेडमधून अटक केली. त्याचबरोबर दरोडेखोराकडून ३ एका देशी पिस्टल व जिवंत काडतुस असा एकूण ५१ हजार ५१० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. सदर कारवाई मेकर पोलिसांनी ३० जुलै रोजी केली.

प्राप्त माहितीनुसार मेहकर पोलीस ठाण्याचे ठाणेदार व्यंकटेश्वर आलेवार यांना गोपनीय बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, मेहकर पोलीस स्टेशन हद्दीत मोळा रोड परीसरात काही इसम दरोडा घालण्याच्या उद्देशाने हत्यारासह दबा धरून बसले आहेत. दरम्यान पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. यावेळी एका टिनपत्र्याच्या शेड मध्ये दबा धरून बसलेल्या ३ आरोपीना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांच्याकडुन दरोडा घालण्याचे घातक शस्त्र व साहित्य जप्त केले. एकूण तीन आरोपी ताब्यात घेतले आहेत. इतर आरोपीचा पोलीस पथकासह शोध घेणे चालु आहे. शेख जुनेद शेख इरफान वय २७ वर्ष व्यवसाय मजुरी रा. पैनगंगा नगर मोळा रोड मेहकर ता. मेहकर जि. बुलढाणा, निखील सिध्देश्वर सोळंके वय २४ वर्ष व्यवसाय मजुरी रा. पवनसुत नगर मेहकर ता मेहकर जि. बुलढाणा, श्रीमती किरण प्रदीप बळी वय ३७ वर्ष रा कोलेश्वर नगर डोणगाव ता मेहकर असे या आरोपींचे नावे आहेत. त्यांच्या कडून २० हजार रुपये किंमतीचे एक देशी बनावटीचे लोखंडी पिस्टल, ५० रुपयांचे एक जिवंत काडतुस, एक लाकडी फळी ज्यावर एका बाजुने ठिकठिकाणी टोकदार लोखंडी खिळे ठोकलेले, १०० रुपयांची एक हिरवी काचेची मुठ असलेलली पेचकस, एक लोखंडी चाकू, एक वक्राकार जुना वापरता कोयता, ड्रिल मशीन, नॉयलान दोरी, ३० हजार रुपयांचे ३ आरोपीचे तीन मोबाईल असा एकूण ५१ हजार ५१० रुपयांचा मुद्देमाल मिळुन आला आहे.सदर कारवाई ही. पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी मेहकर प्रदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मेहकर पोलीस स्टेशनचे पोलीस



निरीक्षक व्यंकटेश्वर आलेवार, सहायक पोलीस निरीक्षक संदीप बिराजे, पोलीस उपनिरीक्षक वसंत पवार, पोलीस उपनिरीक्षक गणेश कड, पोउपनि संदीप मेधने, पोउपनि नितीन मिंड, सपोउपनि सुरेश काळे, पोहेका सुखदेव ठाकरे, पोहेका लक्ष्मण कटक, पोहेका विजय बेडवाल, पोना प्रभाकर शिवणकर, पोकॉ मोहम्मद परसुवाले, पोकॉ इब्राहीम परसुवाले, पोकॉ राजेगावकर, चापोशि संजय पहारे, चापोशि आशिष राठोड, पोकॉ सलीम गवळी, पोशि गणेश वैदय, पोशि समाधान आरमाळ, मपोका आम्रपाली सरकटे यांनी कारवाई केली आहे.